**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१**
**दुरध्वनी क्र. ०२५३-२४६१९०९** Email- kumbhmela.२०२७@mah.gov.in

जा.क्र.नात्रकुंप्रा/बैठक /२०२५/ दिनांक. २८/११/२०२५

प्रति,
१. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर
२. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक
३. मा. जिल्हाधिकारी नाशिक
४. मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर
५. मा. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
६. मा. आयुक्त, महानगरपालिका, नाशिक
७. मा. पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामिण
८. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
९. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टॉमेंट, नाशिक
१०. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक
११. मा. प्रकल्प संचालक, भारतीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक
१२. मा. अधिक्षक, अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नाशिक
१३. मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर / ग्रामीण
१४. मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक
१५. मा. अधिक्षक, अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक
१६. मा. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक.
१७. मा. सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग.
१८. मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन नाशिक
१९. मा. जिल्हाशल्य चिकीत्सक, नाशिक
२०. मा. उपवनसंरक्षक पश्चिम विभाग विभाग नाशिक
२१. मा. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक
२२. मा. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. ९ सा.बा. (राष्ट्रीय महामार्ग विभाग)
२३. मा. जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक
२४. मा. उपसंचालक, (पर्यटन) नाशिक विभाग
२५. मा. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नाशिक
२६. मा. सहा. संचालक महाराष्ट्र राज्य, पुरातत्व विभाग, नाशिक
२७. मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्टसिटी
२८. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभुत सुविधा विकास महमंडळ नाशिक
२९. मा. उपआयुक्त (नियोजन), नाशिक विभाग, नाशिक.
३०. मा. विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ यांचे प्रतिनीधी
३१. मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक
३२. मा. मुख्याधिकारी त्र्यंबक नगरपरिषद
३३. मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभुत सुविधा विकास महमंडळ नाशिक

Scanned with CamScanner

**विषय:** नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२५ रोजी मा.अध्यक्षतेखाली झालेल्या सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळा २०२७ कुंभमेळा प्राधिकरणाच्या दि. २५/११/२०२५ मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक महोदय यांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

Signed by Yogendra Ashok Chaudhari
Date: 28-11-2025 18:23:26

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन),
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण,
नाशिक

Scanned with CamScanner

# नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा दिनांक २५/११/२०२५ रोजी झालेल्या कुंभमेळा प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक २५/११/२०२५ रोजी डॉ.प्रविण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा व प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीत उपस्थितांचे यादी सोबत संलग्न आहे. कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले आणि बैठकीस सुरुवात झाली.

**विषय क्रमांक ०१:- मागील बैठकीचे इतिवृत्तास मंजूरी**

दिनांक १९/११/२०२५ रोजीच्या प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक ०२:- ओझर HAL AIR PORT इमारत बांधकाम करणेबाबत:-**

हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, नाशिक (ओझर) येथे नवीन इंटीग्रेटेड टर्मिनल इमारत बांधकाम करणे कामास दि.१९/११/२०२५ रोजीचे बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करणेस मान्यता देण्यात आली होती. दिनांक २०/११/२०२५ शासनाने दिलेल्या सूचनानुसार सदर काम हे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ विभाग, नाशिक यांचेमार्फत करणेबाबत सूचित करण्यात आले. सदर कामासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ विभाग, नाशिक यांनी सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाची.रु.५७२.०० कोटी इतकी किंमत आहे. कुंभमेळा आयुक्त यांनी सदर कामासाठी लागणाऱ्या DGCA, BCAS, Aerodrome Emergency Management commettee, इ. तसेच राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या आवश्यक परवानगी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांनी त्यांचेस्तरावरुन तात्काळ प्राप्त करुन घेण्यात याव्यात, जेणेकरुन भविष्यात प्रकल्पास विलंब होणार नाही. असे सूचित केले. सन २०१३ मध्ये झालेल्या कराराचे धर्तीवर HAL आणि महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांनी सामजंस्य करार तात्काळ करुन घ्यावा. सदर सामजंस्य करारामध्ये नवीन टर्मिनल इमारत व इतर अनुषंगिक कामांचे देखभाल व दुरुस्तीचा देखील समावेश करण्यात यावा. नवीन टर्मिनल इमारत व इतर कामे पुर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्ती याची जबाबदारी HAL AIR PORT विभागाने घ्यावी. तसेच नवीन ट्रमिनल इमारत सतत व निरंतर नागरी विमान नागरीकांसाठी सुरु ठेवावे. असे कुंभमेळा आयुक्त यांनी सूचित केले. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ विभाग, नाशिक यांनी सदरचे काम हे माहे एप्रिल, २०२७ पुर्वी पुर्ण करण्याचे आश्वासित केले. तसेच महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांनी कामाच्या तांत्रिक बाबी तपासुन वाढीव खर्च (cost overrun) लागणार नाही याबाबत काळजी घ्यावी, असे ठरले. मा.कुंभमेळा आयुक्त यांनी सदर कामामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ विभाग, नाशिक यांना आवश्यक ते सहकार्य करावे, असे निर्देश दिले. शेवटी प्राधिकरणाने दिनांक १९/११/२०२५ चा ठरावातील विषय क्र. ०१ रद्द करुन सदरचे काम महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांचे मार्फत करण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली व याबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी संबंधित कायद्यातील तरतुदी तपासुन आणि आवश्यक त्या अटी शर्ती टाकुन प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करावे, असे ठरले.

**विषय क्रमांक ०३:- नाशिक शहर परिक्रमा मार्ग / रिंगरोड:-**

सा.बां.विभाग, शा.नि.क्र.आरएमआर२०२५/प्र.क्र.१२३/रस्ते-१, दि.२१/११/२०२५ रोजीचे शासन निर्णयान्वये शासनाने नाशिक शहर परिक्रमा मार्ग /रिंग रोड विकसीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य पायाभुत सुविधा महामंडळ यांचेमार्फत हाती घेण्यासाठी मान्यता प्रदान केली असून, सदर परिक्रमा मार्गाच्या भूसंपादनासाठी र.रु.३६५९.४७ कोटी खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाच्या भूसंपादनाकरीता लागणारा खर्च नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाकडून उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे, असे शासन निर्णयामध्ये नमूद केले असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी प्राधिकरणाचे बैठकीत निदर्शनास आणून दिले. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी परिक्रमा मार्गासाठी भूसंपादनासोबतच मोजणी व इतर खर्चांचा देखील समावेश करणे आवश्यक आहे, असे नमूद केले. सदर परिक्रमा मार्गाचे अंतिम रेखाकन (Alignment) मंजुरीकामी प्रस्ताव MoRTH कडे दाखल असून सदर प्रकल्प किमतीत बदल होऊ शकतो असे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ विभाग, नाशिक यांनी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून दिले. शा. नि. क्र. आरएमआर२०२५/प्र.क्र.१२३/रस्ते-१, सा.बां.विभाग, दि.२१/११/२०२५ नुसार सदर कामास सदर कामास MoRTH च्या अंतिम मंजुरीस अधीन राहून प्राधिकरणामार्फत तत्वत: प्रशासकीय मान्यता देण्यात आली आणि त्याबाबतचे आदेश आवश्यक त्या अटी / शर्ती टाकुन कुंभमेळा आयुक्त यांनी निर्गमित करावे, असे ठरले.

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ०४:- पोलीस विभाग:-**

पोलीस विभागाकडून, आगामी काळात सिंहस्थ कुंभमेळा सन २०२६-२७ च्या अनुषंगाने शहरात मोठया संख्येने भाविक येणार असल्याने गर्दी नियोजन, कायदा व सुवस्था बंदोबस्त, वाहतूक नियोजन तसेच आपत्ती व्यवस्थापन करिता नाशिक शहर पोलीस आयुक्तालयास इतर घटकातून येणारे अधिकारी व अंमलदार यांना राहण्यासाठी मंगल कार्यालय/ लॉन्स्, धर्मशाळा, लॉज आतापासूनच आरक्षित करुन ठेवणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. सदरचे लॉन्स्, हॉल आरक्षित करण्यासाठी अग्रिम रक्कम (Advance) देणे आवश्यक असून त्याकामी मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी र.रु.७.६४ कोटी रकमेचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे मान्यतेस्तव सादर केला आहे, असे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले. सदर लॉन्स्, हॉल आरक्षित करण्यासाठी अग्रिम रक्कम र.रु.७.६४ कोटी रकमेच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता देण्याबाबत प्राधिकरणाने मंजूरी दिली. तसेच मंगल कार्यालय/ लॉन्स्, धर्मशाळा, लॉज यांचेसाठी दयावयाचे दर हे कुंभमेळा आयुक्त यांनी प्रचलित नियमानूसार निश्चित करावे, असे मा.अध्यक्ष यांनी, सूचित केले. याप्रमाणेच म.रा.रस्ते परिवहन मंडळ, रेल्वे व इतर संबंधित विभागांचे कर्मचारी, सफाई कर्मचारी यांना राहण्यासाठी मंगल कार्यालय / लॉन्स्, धर्मशाळा, लॉज आरक्षित करणे आवश्यक असून त्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागांकडून सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले.

**विषय क्रमांक ०५:- कुंभमेळा प्राधिकरण कार्यालय स्थापन करण्यासाठी जिल्हा परिषद, नाशिक इमारत भाडे तत्वावर घेणे व किरकोळ दुरुस्ती करणे:-**

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे कार्यालय स्थापित करण्यासाठी जिल्हा परिषद भवन, जुनी इमारतीची जागा भाडे तत्वावर घेण्याचे प्रस्तावित असून सदर इमारतीचा काही भाग कार्यालय स्थापित करण्यासाठी आवश्यक असून त्यास भाडेदरानूसार दरमहा अंदाजे र.रु. ४० ते ४५ लक्ष रुपये इतकी भाडे रक्कम जिल्हा परिषद, नाशिक यांनी कळविले आहे.तसेच सदर इमार्तीसाठी किरकोळ दुरुस्ती व फर्निचरची आवश्यकता असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी निदर्शनास आणून दिले, त्यावर झालेल्या चर्चेनुसार सदर भाडे रक्कम प्रचलित नियमानुसार संबंधित विभागांकडून पडताळणी करुन कुंभमेळा आयुक्त यांनी भाडे रक्कम निश्चिती व आवश्यक किरकोळ दुरुस्ती व फर्निचर साठी येणारया खर्चास प्राधिकरणाने मान्यता दिली.

**विषय क्रमांक ०६:- घाट परिसर विकास कामे:-**

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ विभाग, नाशिक यांनी एकुण चार घाटाचे विस्तार व विकास कामाचे अनुक्रमे प्रस्ताव क्र. १ लक्ष्मी नारायण घाट, क्र.२ नंदिनी नदीवरील STP प्रकल्पाजवळील घाट, क्र.३ सोमेश्वर मंदिर, धबधबा, क्र.४ नवश्या गणपती अशा चार घटांचे विकास कामांचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यात आले आहे. असे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले त्यानूसार प्राधिकरणाने सदर प्रस्तावास प्रशासकिय मान्यता देण्यासाठी मान्यता दिली.

**विषय क्रमांक ०७:- वाहतूक बदल व पोलीस / वार्डन व्यवस्थापन:-**

नाशिक शहर वाहतूक पोलीस विभागाने आगामी कालावधीत कुंभमेळयाची कामे सुरु होणार असून सदर कामांमुळे शहर वाहतूकीमध्ये बदल होणार असल्याने वाहतूक नियंत्रण व सुसूत्रिकरण करण्यासाठी पोलीस वार्डन नेमण्याची आवश्यकता असल्याचे पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी सूचित केले आहे. त्यानूसार कुंभमेळा आयुक्त यांनी ज्या रस्त्यासाठी पोलीस वार्डनची आवश्यकता आहे त्या कामासाठी देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या बचतीतून सदर खर्च भागविणे बाबत नाशिक महानगरपालिका यांनी पडताळणी करावी, असे सुचविले.

वर प्रशासकीय मान्यता देण्याबाबत निर्णय झालेले प्रकल्प हे शासनाचे पत्र दिनांक २९/०८/२०२५ मध्ये नमुद यादी आणि / किंवा वित्तीय मर्यादेच्या पलीकडचे असुन शासन स्तरावरून प्राप्त सुचना, काम पुर्ण करण्यासाठी उर्वरित उपलब्ध वेळ, शासनाचे दिनांक २९/०८/२०२५ चे पत्र आल्यानंतर उद्भवलेल्या मागण्या आणि संबंधित घटनाक्रम आणि / किंवा शासन स्तरावरून प्राप्त झालेल्या सुचना अशा कारणांमुळे देण्यात आलेली आहे. याकरीता नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातील तरतुदीनुसार कुंभमेळ्याच्या आराखड्यास मान्यता घेतांना शासनाची कार्योत्तर मान्यता घ्यावी. सदर कामास प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आणि कुंभमेळा आयुक्त यांनी याबाबत आवश्यक ती छाननी करुन आणि योग्य त्या अटी शर्ती टाकुन प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करावे, असे ठरले.

बैठकीच्या शेवटी अध्यक्षांनी असे सांगितले की, बरेच विभाग आणि कार्यान्वीत यंत्रणा आपले विषय अचानक आणि घाई करुन मान्यतेसाठी सादर करतात व त्यात बरेचदा परिपुर्णता नसते. तरी यापुढे सर्व विभाग व कार्यान्वीत यंत्रणांनी आपले प्रस्ताव परिपूर्ण आणि काळजीपुर्वकच सादर करावेत आणि प्राधिकरणाच्या बैठकीसमोर सादर करण्यापुर्वी कुंभमेळा आयुक्त यांना ते छाननी करण्यासाठी पुरेसा कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी. कुंभमेळा आयुक्त यांनी देखील याबाबतची छाननी करुन

Scanned with CamScanner

आवश्यक ती प्राथमिक माहिती बैठकीच्या अजेंड्यासोबत सदस्यांना पुर्वतयारीसाठी पाठवावी जेणेकरुन सांगोपांग चर्चा होऊन उचित निर्णय घेता येतील.

मा.कुंभमेळा आयुक्त यांनी बैठकीस उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहीर केले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 27-11-2025 14:39:17

**(डॉ.प्रविण गेडाम)** (भा.प्र.से.)
**अध्यक्ष, कुंभमेळा**
**नाशिक त्रंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**

**प्रति,**

१. मा. विभागीय आयुक्त नाशिक
२. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर
३. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक
४. जिल्हाधिकारी नाशिक
५. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर
६. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
७. आयुक्त, महानगरपालिका, नाशिक
८. पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामिण
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कंन्टॉमेंट, नाशिक
११. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक
**१२.** प्रकल्प संचालक, भारतीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक
**१३.** अधिक्षक, अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नाशिक
१४. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर / ग्रामीण
**१५.** अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक
१६. अधिक्षक, अभियंता,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक
**१७.** सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक.
**१८.** सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग.
**१९.** उपसंचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन नाशिक
२०. जिल्हाशल्य चिकीत्सक, नाशिक
२१. उपवनसंरक्षक पश्चिम विभाग विभाग नाशिक
**२२.** विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक
२३. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.९ सा.बा.(राष्ट्रीय महामार्ग विभाग)
**२४.** जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक
२५. उपसंचालक, (पर्यटन) नाशिक विभाग
२६. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नाशिक
**२७.** सहा.संचालक महाराष्ट्र राज्य, पुरातत्व विभाग, नाशिक
**२८.** मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्टसिटी
**२९.** कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभुत सुविधा विकास महमंडळ नाशिक
३०. उपआयुक्त (नियोजन), नाशिक विभाग, नाशिक.
**३१.** विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ यांचे प्रतिनीधी
**३२.** कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक
**३३.** मुख्याधिकारी त्र्यंबक नगरपरिषद
**३४.** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ विभाग

Scanned with CamScanner